# <u>यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ</u>

## <u>नोकरभरती जाहिरात</u>

### (कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी [शिपाई] पदांच्या भरतीकरीता)

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ यांना खालील रिक्त पदे भरण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन विहीत नमन्यात ऑनर्लान अर्ज मागविण्यात येत आहेत. बँकेचे नोकरभरतीचा संकेत स्थळ www.yavatmaldccbank.co.in आहे व www.ydccbank.org या संकेत स्थळावर नोकरभरतीची link उपलब्ध आहे.

| अ. क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणा करण्याचा कालावधी | दि.१३.०३.२०१९ सकाळी ११.०० पासुन ते दि.०१.०४.२०१९ रात्री ११.०० वा.पर्यंत |
| २ | **परिक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक** | **दि.३०.०३.२०१९ दुपारी ५.३० वा.पर्यंत** |
| ३ | परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४ | परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५ | मुलाखत दिनांक | ऑनलाईन परिक्षा निकालानंतर बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |

**-: सुचना :-**

१. परिक्षा शुल्क संकेत स्थळावर अद्यावत [Update] केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रीया पुर्ण होणार नाही.

२. उमेदवारांना परिक्षा शुल्काची रक्कम यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व शाखांमध्ये चलानव्दारे भरणा करावी लागेल.

३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना त्यांचा **<u>ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक</u>** अचुक भरणे आवश्यक आहे.

४. उमेदवारांनी अर्ज भरतांना सदर पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा.

५. सदर भरती प्रक्रीयेदरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रीयेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

६. अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक तो निर्णय घेण्याचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.

**शैक्षणिक अर्हता :-**

| पदाचे नांव | पदसंख्या | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | इतर पात्रता |
|---|---|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | १३३ | १८ ते ३५ वर्षे | कोणत्याही शाखेचा पदविधर, किमान ४५% गुणांनी उत्तीर्ण असावा. | GDC&A, तसेच CAIIB किंवा बँकींग डिप्लोमा असल्यास प्राधान्य, संगणकाचे ज्ञान आवश्यक राहील. |
| सहाय्यक कर्मचारी [शिपाई] | १४ | १८ ते ३५ वर्षे | दहावी पास | --- |

* ऑनलाईन अर्ज भरण्याच्या दिनांकापर्यंत उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

* **परिविक्षाधीन कालावधीनंतर प्राप्त होणारे अंदाजित एकुण वेतन :-**

| | |
|---|---|
| कनिष्ठ लिपीक | रु.१७०००/- ते १८०००/- |
| सहाय्यक कर्मचारी [शिपाई] | रु.१४०००/- ते १५०००/- |

(परिस्थितीनुरुप वेतन निश्चीतीचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.)

* **निवड कार्यपध्दती :-**

१) **ऑनलाईन परिक्षा :-**

कनिष्ठ लिपीक श्रेणीतील पदांकरीता ९० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. यामध्ये बँकींग, मराठी व्याकरण, इंग्रजी, सामान्य ज्ञान, गणित व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल. तसेच परिक्षेचे माध्यम मराठी असेल.

सहाय्यक कर्मचाऱ्यांकरीता ९० गुणांची ऑनलाईन परिक्षा राहील. त्यामध्ये सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल.

२) **कागदपत्रे पडताळणी :-**

उमेदवारांस ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्रांची प्राथमिक कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे बँक मुलाखतीस पात्र होईल.

३) **मुलाखत :-**

कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी [शिपाई] पदासाठी ऑनलाईन परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात ऑनलाईन

परिक्षेचे गुणानुक्रमे मौखीक मुलाखतीस बोलाविण्यात येईल. मौखीक मुलाखतीकरीता १० गुण (शैक्षणिक पात्रतेकरीता ५ गुण व मौखिक मुलाखतीकरीता ५ गुण) राहतील. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही.

४) **उमेदवाराची अंतिम निवड सुची :-**

उमेदवाराचे ऑनलाईन परिक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण यांची बेरीज करुन एकुण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सुची तयार करण्यात येईल.

* **परिविक्षाधिन कालावधी [प्रोबेशन पिरियड] :-**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना एक वर्षासाठी परिविक्षाधिन [प्रोबेशनरी] सेवेत नेमणुक दिली जाईल. नेमणुक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीमध्ये कनिष्ठ लिपीकास रु.९०००/- प्रति महिना व सहाय्यक कर्मचाऱ्यास रु.५०००/- प्रति महिना एकत्रित पगार देण्यात येईल.

* **ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत :-**

१) कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी [शिपाई] पदाकरीता अधिकृत संकेत स्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नोंदविलेला ई-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर [DND] असल्यामुळे संपुर्ण प्रक्रीयेदरम्यान त्या व्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जाबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आय.डी. व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रीयेदरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर याबाबत वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रीयेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याचे पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहीती भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा वगैरेची पात्रता तपासुन ऑनलाईन अर्ज भरावा.

३) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चीत करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रीयेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतनु बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखुन ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारांना कोणतीही तक्रार करता येणार नाही.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.yavatmaldccbank.co.in व www.ydccbank.org या संकेत स्थळांवर उपलब्ध आहेत.

५) कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी [शिपाई] पदाकरीता रु.१०००/- सर्व करांसह परिक्षा शुल्क आकारल्या जाईल. परिक्षा शुल्क हे ना-परतावा राहील. परिक्षा शुल्काची रक्कम फक्त यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये रोखीने भरणा करता येईल. **त्यासाठीचे परिक्षा शुल्क दि.३०.०३.२०१९ रोजी दुपारी ५.३० वा.पर्यंत स्विकारले जाईल.** परिक्षा शुल्क भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

६) **परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे स्विकारले जाईल.**

उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील जाहिरात व सुचना वाचुन घ्याव्यात. त्यानंतर [Apply Online] ऑनलाईन या बटनावर क्लीक [click] करावे. ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्यानंतर परिक्षा शुल्क पुढीलप्रमाणे भरावयाचे आहे.

परिक्षा शुल्क यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व शाखांमध्ये रोखीने चलानव्दारे भरणा करता येईल. त्यासाठी संकेत स्थळावर पैसे भरण्याची चलान परिक्षा अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर प्राप्त होईल. सदर चलान यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखेत जमा केल्यास शाखेकडुन सदर चलानचा बॅच नंबर मिळेल. सदर बॅच नंबर संबंधीत संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन फॉर्मवर अपडेट करणे. बॅच नंबर अपडेट केल्यानंतर अर्ज भरण्याची प्रक्रीया पुर्ण होईल. त्यानंतर उमेदवारांनी त्यांचा अर्ज संकेत स्थळावरुन स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करुन घेणे. ही सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

७) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे JPG/JPEG या प्रकारामध्ये स्कॅन केलेले अद्यावत छायाचित्र [फोटो] व पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्वत: स्वाक्षरी करुन JPG/JPEG या प्रकारामध्ये स्कॅन केलेली स्वाक्षरी संकेत स्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र [फोटो], स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज, तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या ईमेजची फाईल साईज संकेत स्थळावर नमुद आहे.

८) ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम तारीख दि.०१.०४.२०१९ रोजी रात्री ११.०० वाजेपर्यंत असुन त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरणा करण्याची लिंक बंद केली जाईल. **परिक्षा शुल्क भरणा करण्याची माहिती संकेत स्थळावर अद्यावत [Update] करण्याची अंतिम तारीख दि.०१.०४.२०१९ रोजीपर्यंत राहील.**

**<u>ऑनलाईन परिक्षेच्या सुचना</u> :-**

ऑनलाईन परिक्षेची माहिती उमेदवारास ई-मेल / एस.एम.एस.व्दारे कळविण्यात येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची व विविध सुचना या केवळ संबंधीत संकेत स्थळावर उपलब्ध होतील. सदर माहिती पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाही. सबब सदर भरती प्रक्रीये दरम्यान संकेत स्थळावर याबाबत वेळोवेळी अवलोकन करुन भरतीप्रक्रीयेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. उमेदवारास ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आय.डी. व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

**<u>सर्वसाधारण सुचना</u> :-**

१) उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल.

३) काही अपरिहार्य/आपातकालीन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे, पुढे ढकलणे, अंशत: बदल करण्याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

४) भरती प्रक्रीये दरम्यान उद्‌भवणारे वाद/तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

५) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा/कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

६) भरती प्रक्रीयेत/निवड कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात व संकेत स्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना पत्राने लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

७) उमेदवाराचे महाराष्ट्र राज्यात अधिवास असणे आवश्यक आहे. यवतमाळ जिल्ह्यात अधिवास असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

८) विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीनंतर सादर करणे बंधनकारक राहील.

९) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने यवतमाळ शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र आवश्यकतेनुसार इतर केंद्रावरही परिक्षा घेतली जाईल.

१०) बँकेने सदर भरती प्रक्रीया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लीकेशन एजंसीची/व्यक्तीची नियुक्ती केलेली नाही. यासंदर्भात कोणतीही जाहिरात अगर माहिती ही बेकायदेशीर आहे असे समजण्यात यावे.

११) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२) अर्जदारांना अर्ज भरतांना अडचणी/शंका असल्यास या संदर्भातील FAQ's, Application Login Page वर उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त काही अडचण आल्यास संकेत स्थळावरील कॉल सेंटरवर स.१०.०० ते ५.०० वा.पर्यंत संपर्क करावा.

सदर पदांमध्ये वाढ किंवा घट झाल्यास रिक्त पदाच्या संख्येत बदल करण्याबाबतचे अधिकार पुर्णपणे बँकेस राहतील.

**ठिकाण :** यवतमाळ **मुख्य कार्यकारी अधिकारी** **अध्यक्ष**

**दिनांक :-** ............. **यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ**